# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रारीची तपासणी सूची

## क्र. रामाआ/तक्रार/५९८/२०२२/अहिल्यानगर

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. प्रकाश सुखदेव अहिरे,<br>रा.मोरगे वस्ती, वॉर्ड नं.७,मु.पो.ता.श्रीरामपूर,<br>जि.अहिल्यानगर. | नायब तहसिलदार, संजय गांधी योजना, तहसिल कार्यालय, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर. |

## सुनावणी दिनांक-१४/०७/२०२३

तक्रारदार यांनी दि.०७/१२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, संजय गांधी निराधार योजना, तहसिल कार्यालय श्रीरामपूर यांनी आपलेकडील निर्णय (आदेश) मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थी यांना माहिती अधिकारात मागितलेली माहती समक्ष अवलोकनासाठी वेळ व तारीख कळविणेसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पाठविण्याचे आदेशीत करण्यात आलेले होते. मात्र संजय गांधी निराधार योजना, तहसिल कार्यालय श्रीरामपूर येथील संबंधितांनी आपल्या सारख्या वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाची पायमल्ली करुन मोठा कालावधी उलटुनही आजपावेतो अपीलार्थीस अवलोकनासाठी बोलविले नाही अथवा उर्वरीत माहितीही उपलब्ध करुन दिलेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सुनावणीसाठी – तक्रारदार आणि तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

३. तक्रारदार यांनी मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

संजय गांधी निराधार योजना विभागांतर्गत १) संजय गांधी निराधार बैठकीचे इतिवृत्ताच्या प्रती. २) संजय गांधी निराधार बैठक निहाय पात्र लाभार्थ्यांची यादी तसेच, ३) संजय गांधी निराधार बैठक निहाय अपात्र लाभार्थ्यांची यादी, त्रुटी, शेरा आदींसह माहिती.

४. आयोगाने द्वितीय अपिल क्र.१८५/२०२१/अहिल्यानगर संदर्भात दि.०२/०८/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, संजय गांधी योजना, तहसिल कार्यालय, श्रीरामपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६/०८/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन १०० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामुल्य पुरवावी. त्यापेक्षा अधिकची माहिती हवी असल्यास योग्य ते शुल्क आकारुन पुरवावी."

५. सुनावणी दरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, संजय गांधी योजना, तहसिल कार्यालय, श्रीरामपूर, यांनी असे नमूद केले की, आयोगाने द्वितीय अपिल अपिल क्र.१८५/२०२१/अहिल्यानगर संदर्भात दि.०२/०८/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशांनुसार दि.१६/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदार यांच्या दि.०६/०८/२०२० रोजीच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ अर्जान्वये आपण मागितलेली माहिती कार्यालयात अभीलेख स्वरुपात उपलब्ध असून मा.राज्य माहिती खंडपीठ नाशिक यांचेकडील पत्रात नमुद निर्देशानुसार सदर माहितीचे आपण कार्यालयात येऊन समक्ष अवलोकन करावे. तद्नंतर आपणास हव्या असलेल्या छायांकित प्रती पुरविणेत येतील. तरी आपण दिनांक-१८/०१/२०२३ रोजी कार्यालयात समक्ष उपस्थित राहावे. त्यानुषंगाने दि.१८/०१/२०२३ रोजी तक्रारदार श्री.प्रकाश सुखदेव आहिरे आज रोजी समक्ष उपस्थित राहुन माहिती आणि पत्र घेणेस नकार दिला. तद्नंतर दि.२७/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयात अभीलेख स्वरुपात उपलब्ध असलेली एकूण ३६९ पृष्ठांची माहिती दि.०२/०२/२०२३ रोजी रजिस्टर पोस्टाने विनामुल्य अपिलार्थी यांना दिली आहे.

६. सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगासमोर द्वितीय अपिल क्र.१८५/२०२१/अहिल्यानगर मध्ये दि.०२/०८/२०२२ रोजीच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, संजय गांधी योजना, तहसिल कार्यालय, श्रीरामपूर, यांनी दि.२७/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदार यांना एकूण ३६९ पृष्ठांची माहिती दिली आहे त्यानुषंगाने सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नसल्याने निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्र.५९८/२०२२/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ९८८८ 10 MAR 2025